॥श्री राम समर्थ॥ ॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड मो. ९७६७०४०८४३ ७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातींची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २१६ वा | गुरुवार, दि. ०२ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

# रोहित पवार जागते रहो...!

## अजित पवारांचा खून दडपण्यासाठी अशोक खरात प्रकरणाचा टोटका वापरला जातोय का ?

दत्तकुमार खंडागळे
मो. 9561551006







सध्या मराठी माध्यमात सकाळपासून संध्याकाळ पर्यत फक्त आणि फक्त भोंदू अशोक खरात चालवला जातो आहे. चोवीस तास अशोक खरात एके अशोक खरात दाखवला जातो आहे. भारत देशात तथाकथित साधूंच्या संस्कृतीची हागणदारी अशीच आहे. ब्राम्हण्यवादी सनातन संस्कृती म्हणजे फुलं टाकून झाकलेली विष्ठा आहे. धर्माच्या नावावर चालू असलेले शोषण तेवढेच सनातन आणि पुरातन आहे. प्रबोधनकार ठाकरेंनी याला शौचकुप म्हंटलय. असला प्रकार अशोक खरातने इतिहासात पहिल्यादाच केलाय असं नव्हे. देवांचा राजा म्हणून ज्याची ओळख सांगितली जाते त्या इंद्राने अहिल्येचा पती गौतम ऋषीचे सोंग घेवून अहिल्येवर बलात्कार केल्याचा दाखला ब्रम्हपुराण, पद्मपुराण व रामायण-महाभारततातही आहे. पुराणात असे कैक बलात्कार नमूद आहेत. इंद्रापासून आसाराम, रामरहिम ते अशोक खरात पर्यत हा सिलसिला चालूच आहे. इथं धर्माच्या नावाने व्यवस्थाच अशी तयार केली आहे की ज्यांचे शोषण केले जाते त्यांनाही हे शोषण वाटत नाही. बाकी जो सापडतो तो भोंदू असतो आणि इतर सगळे साधू असाच नियम आहे. यात काही सन्माननीय संतांचे अपवाद वगळता साधूच्या वेशातले अनेकजण असेच असतात. अशोक खरात जेवढा माध्यमातून चालवला जातोय तेवढाच तो पुण्यातील स्वतःला महादेवाचा अवतार म्हणून घोषित करणारा "वैद्य बुवा" चालवला जात नाही याचे कारण काय ? अशोक खरातनेही "गु" खाल्ला आणि 'वैद्य' बुवानेही "गु" च खाल्ला पण माध्यमं चघळतात फक्त खरातचा, वैद्य बुवाचा बिलकुल नाही. हा जात गोतावळ्याचा दुजाभाव यात आहेच पण त्या ही पलिकडे जाऊन अजित पवार हत्या प्रकरण दडपण्यासाठी, त्यावरून लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी, लोकांना त्याचा विसर पाडण्यासाठी अशोक खरातचे कारनामे चोवीस तास माध्यमं दाखवतात की काय? असा संशय येतो आहे. अशोक खरात प्रकरण हे अजित पवारांची हत्या दुर्लक्षित व्हावी. त्या बाबत लोकांच्यात चालणारी चर्चा थांबावी यासाठी खरात प्रकरणाला 'टोटका' म्हणून वापरले जातेय की काय ? असे वाटते आहे. त्यामुळे अजित पवार प्रकरण उचलून धरणा-या आमदार रोहित पवार यांनी सावध रहायला हवं. त्यांनी ठामपणे या प्रकरणाच्या तळाशी जायला हवं. जोपर्यंत नेमकं सत्य हाताला लागत नाही तोपर्यंत लढत रहायला हवं. म्हणूनच आम्हाला रोहित पवार यांना सावध करण्यासाठी, रोहित पवार जागते रहो! असं आवाहन करावं वाटतं आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू संशयास्पद वाटतो. राज्यातील तमाम जनतेच्या मनात त्याबाबत संशय येत राहतो पण सरकार त्यावर पारदर्शीपणे काम करत नाही. त्याबाबत गुन्हा दाखल करायला गेल्यावर गुन्हा दाखल करून घेत नाही. टाळाटाळ केली जाते. शेजारच्या कर्नाटकात सदर घटणेबाबत गुन्हा दाखल झाल्यावर राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमत्री विधानभवनात आदळआपट करताना दिसतात. त्यांना तो राज्याचा अपमान वाटतो. कर्नाटकात गुन्हा दाखल झाल्यावर त्यांच्या बुडाला मिरच्या का झोंबल्या? त्यांनी इतकी आदळआपट का केली? असे प्रश्न पडल्यावाचून रहात नाहीत. त्यांना जर अजित पवार प्रकरणाबाबतचे मळभ दुर करायचेच आहे तर त्यांनी याबाबत महाराष्ट्रात गुन्हा का दाखल करून घेतला नाही? जिथं कोंबड्या-कुत्र्यांच्या चोरीचे, हत्येचे गुन्हे दाखल होतात तिथे राज्याचा उपमुख्यमंत्री संशयास्पदरित्या मरतो त्याचा गुन्हा का दाखल करून घेतला जात नाही? या मागचे कारण काय? हा अस्वस्थ करणारा व संशयास जागा देणारा प्रश्न आहे. अजित पवारांच्या मृत्यूनंतर राज्यात उघड-उघडपणे त्यांचा 'खून' च झाला अशी चर्चा सुरू आहे. राज्यात सर्वत्र हेच बोललं जातय. समाजाच्या सगळ्या थरात दबक्या आवाजात नव्हे तर उघडपणे लोक बोलत आहेत. तसेच सदरची हत्या अमित शहा, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, फडणवीस, तटकरे व पटेल यांनीच केली असावी असे बोलत आहेत. अशा काळात अशोक खरात प्रकरण पुढे येते. सर्वत्र त्याचीच चर्चा घडवली जाते. खरातच्या रासलिलांचे व्हिडीओ खुराक वाटल्यासारखे समाज माध्यमात पुरवले जातात. सदरचे व्हिडीओ सोशल माध्यमात इतक्या मोठ्या संख्येने आले कसे? ते कुणी पसरवले? का पसरवले? जर संबंधीत व्हिडीओ पोलिसांच्याकडे होते तर सोशल माध्यमात खिरापत वाटल्यासारखे कुणी पसरवले? त्यामागचे कारण काय? हा प्रश्न बुचकळ्यात टाकणारा आहे. खरातच्या ऑफीसबॉयने हे व्हिडीओ माध्यमात पसरवलेत की सरकारने पसरवलेत? याचा खुलासा होणे गरजेचे आहे. अजित पवारांच्या हत्येची लोकांच्यातली चर्चा थांबली जावी. सदरचे प्रकरण विसरले जावे यासाठी अशोक खरातच्या रासलिलांचा वापर केला जात असावा अस वाटतं. चोवीस तास माध्यमं केवळ अशोक खरात, अशोक खरात करताना दिसत आहेत. राज्याचा उपमुख्यमंत्री संशयास्पदरित्या मरतो, त्याचा गुन्हा दाखल होत नाही. त्यावर माध्यमातले लोक चर्चा करत नाहीत. सरकारला प्रश्न विचारत नाहीत. खरातचा भाऊ, बायको, सीए, ऑफीस बॉय, त्याच्याकडे जाणारे राजकारण्यांसकट विविध भक्त यांच्या बातम्यांचा रतीब घातला जात आहे. खरात हागत कसा होता ? खरात मुत कसा पाजत होता ? खरात कनेक्शन कुठे कुठे आहे ? हे दाखवण्यासाठी सर्वांचा आटापिटा चालू आहे. खरात हरामी आहे. तो नागडा झालाच पाहिजे पण इतकी तीव्रता, "तु माझी पार्वती, मी तुझा शंकर आहे!" म्हणून महिलांच्यावर बलात्कार करणा-या वैद्यबुवाच्या प्रकरणाला का नाही ? इतकी तीव्रता अजित पवारांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाला का नाही ? असे अनेक प्रश्न या निमित्ताने पडत आहेत.

समाज माध्यमातून अशोक खरातच्या रासलिलांचे मुबलक व चमचमीत दर्शन आणि वृत्तवाहिण्यांवर त्याच्या बातम्यांचा रतीब घालण्यामागे नेमका काय खेळ खेळला जातोय ? माध्यमांना हाताशी धरत अजित पवार हत्या प्रकरण दडपण्याचा डाव खेळला जातोय का ? लोकांची दिशाभुल केली जातेय का ? असे प्रश्न या निमित्ताने पडत आहेत. अशोक खरातची सालटी सोला, त्याने बलात्कार केले असतील तर त्याचे गुप्तांग छाटा पण त्याच वेळी अजित पवार यांच्या मृत्यूबाबत लोकांना पडलेल्या प्रश्नांची उत्तरंही जनतेला द्या. सदर प्रकरणाचा तपासही प्रामाणिकपणे व्हावा. त्याबाबत लोकांच्यात असणारे संभ्रमही दुर करा. देशाच्या प्रधानमंत्र्याबाबत, गृहमंत्र्याबाबत व राज्याच्या मुख्यमंत्र्याबाबत (पान 2 वर..)

## चेसी क्रॅक बसेस प्रकरणात अधिकाऱ्यांवर कारवाई



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महापालिका अंतर्गत परिवहन उपक्रमाचा सन 2026- 27 या आर्थिक वषार्चा 64 कोटी 50 लाखांच्या अंदाजपत्रकाला महापालिका सभेत एकमताने मान्यता देण्यात आली. यापूर्वी केंद्रशासनाच्या जेएनयुआर योजनेतून खरेदी करण्यात आलेल्या शंभर बसेस चेची क्रॅक प्रकरणाची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महापालिकेच्या सभागृहात परिवहन उपक्रमाच्या अंदाजपत्रकावर विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी महापौर विनायक कोंड्याल हे होते. अद्यापही महापालिका परिवहन समिती स्थापन न झाल्याने परिवहन उपक्रम प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकावर स्थायी समितीत मान्यता देऊन पुढील शिफारसी साठी सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात आले होते. यानुसार सर्वसाधारण सभेत हा अंदाजपत्रक स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते यांनी मांडला. सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी या संदर्भातील सूचना केली. विरोधी पक्षाकडून यावर कोणतीही उपसूचना न आल्याने झटक्यातच महापालिकेचा अंदाजपत्रकाला एकमताने महापौरांनी मान्यता दिली.

सन 2025-26 या आर्थिक वर्षामध्ये एकूण 10 ते 12 बसेस धावलेले असून आता बसेसची संख्या ही 35 इतकी दाखविण्यात आली आहे. पुढील आर्थिक वर्षात सन- 2026-27 मध्ये केंद्र शासनाकडून येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील 30 बसेससह 40 पेक्षा अधिक बसेस धावणार असल्याचे दाखवत त्यामधून उत्पन्नात वाढ होईल आणि प्रवाशांची सोय होणार असल्याचे नव्या अंदाजपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

गतवर्षी परिवहनचे अंदाजपत्रक हे 59 कोटी 31 लाखाचे होते. यामध्ये यंदा 5 कोटी 19 लाख रुपये वाढ करण्यात आली आहे. यापूर्वी महापालिकेकडून परिवहन विभागाला अनुदान स्वरूपात 14 कोटी रुपये मिळालेले आहे. शिवाय आता चालू आर्थिक वर्षात देखील महापालिकेकडून 17 कोटी 32 लाख 80 हजार रुपयांचे अनुदान अपेक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यासह विविध जमा खर्च दाखविण्यात आले असून या अंदाजपत्रकाला सभागृहात मान्यता देण्यात आली.

## जैन मुनी आचार्य नयन पद्मसागर यांच्या वक्तव्यावरून संताप

### गुन्हा दाखल करण्याची मागणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती संभाजी महाराज आणि महाराणी ताराराणी यांच्या संदर्भात कथित चुकीचे व ऐतिहासिकदृष्ट्या दिशाभूल करणारे वक्तव्य केल्याच्या आरोपावरून जैन मुनी आचार्य नयन पद्मसागर यांच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी करत मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले.

मराठा आंदोलक तथा मराठा क्रांती मोचार्चे राज्य समन्वयक राम भैय्या जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित वक्तव्याचा व्हिडिओ पुरावा पोलीस निरीक्षक महादेव राऊत यांना सादर करण्यात आला आहे. आचार्य नयन पद्मसागर यांनी आपल्या भाषणात छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूविषयी व महाराणी ताराराणी यांच्या इतिहासाविषयी चुकीची माहिती दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विशेषतः 'ताराबाई या जैन राणी होत्या' तसेच संभाजी महाराजांबाबत अमानुष अत्याचारांच्या संदर्भात चुकीचे वर्णन केल्याचे सांगत या वक्तव्यामुळे शिवभक्तांच्या भावना दुखावल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. यावेळी आंदोलकांनी स्पष्ट केले की, महाराणी ताराराणी या सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या असून त्या छत्रपती राजाराम महाराजांच्या धर्मपत्नी होत्या. तसेच धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी बलिदान दिले असून त्यांच्या शौयार्चा अवमान सहन केला जाणार नाही, अशी भूमिका व्यक्त करण्यात आली.

'अशा प्रकारे खोटा इतिहास पसरवणाऱ्यांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा, अन्यथा मराठा समाज व शिव-शंभू भक्त रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील,' असा इशारा राम भैय्या जाधव यांनी दिला.

या वेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा संपर्क प्रमुख छत्रगुण माने, किरण शिरसागर, सागर गायकवाड, अक्षय माळेदकर, शुभम खटमोडे यांच्यासह अनेक शिवभक्त उपस्थित होते.

## दहावीच्या अतिरिक्त परीक्षेसाठी शिकवणी शुल्क आकारणाऱ्या शाळांवर कारवाई



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांचे गुण सुधारण्यासाठी घेण्यात येणाऱ्या अतिरिक्त परीक्षेसाठी शिक्षणशुल्क आकारण्यात येऊ नये अशी सूचना देतानाच बेकायदेशीरपणे शुल्क वसूल करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करण्यात येईल अशी तंबी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) देशातील सर्व संलग्न शाळांना दिला आहे.

त्यामुळे गुण सुधारण्यासाठी होणाऱ्या परीक्षेच्या तयारी करून घेण्यासाठी सीबीएसईच्या शाळा शुल्क घेत असल्यास त्यांची तक्रार पालक करू शकतील.

दहावीच्या दुसऱ्या बोर्ड परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची 'लिस्ट ऑफ कॅन्डिडेट्स' म्हणजेच विद्यार्थ्यांची यादी सादर करण्याच्या सूचना मंडळाने शाळांना दिल्या आहेत. ही प्रक्रिया तीन टप्प्यांत विभागली आहे. पहिल्या टप्प्यात केवळ विद्यार्थ्यांची नोंदणी करायची आहे. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारायचे नाही. या टप्प्याचा उद्देश परीक्षेस बसणाऱ्या संभाव्य विद्यार्थ्यांची संख्या निश्चित करणे हा आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांना विषयांमध्ये बदल, समावेश किंवा वगळण्याची संधी देण्यात येणार असून, त्याचवेळी नियमानुसार परीक्षा शुल्क भरून अंतिम नोंदणी पूर्ण केली जाणार आहे. ही प्रक्रिया संबंधित शाळांमार्फत पार पाडली जाणार आहे. यासंदर्भातील परिपत्रक सीबीएसई मंडळाने १७ मार्च रोजी प्रसिद्ध केले आहे.

मात्र काही शाळांकडून ही नोंदणी करताना विद्यार्थ्यांकडून तीन महिन्यांचे शिकवणी शुल्क घेतले जात आहे. यासंदभार्तील तक्रारी विद्यार्थी व शिक्षकांकडून मंडळाकडे करण्यात आल्या आहेत. याची दखल घेत मंडळाने हे पूर्णपणे नियमबाह्य असून, शुल्क घेण्याचे प्रकार तात्काळ थांबवण्याचे आदेश दिले आहेत. विद्यार्थ्यांची यादी सादर करण्याच्या प्रक्रियेदरम्यान केवळ अधिकृत परीक्षा शुल्कच आकारले जाऊ शकते. त्याव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त किंवा अनधिकृत शुल्क आकारण्यास सक्त मनाई आहे.

तसेच, परीक्षा शुल्क भरल्यानंतरही एखाद्या विद्यार्थ्याने दुसऱ्या बोर्ड परीक्षेस बसण्याचा निर्णय बदलल्यास, त्याच्या मुख्य परीक्षेतील गुणांवरच निकाल जाहीर केला जाईल, असेही मंडळाने स्पष्ट केले आहे. तसेच दहावीच्या दुसऱ्या बोर्ड परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांकडून शुल्क घेणाऱ्या शाळांवर नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कडक कारवाईचा इशाराही मंडळाने दिला आहे. सीबीएसईच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांवरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत होणार आहे. — गुण सुधार परीक्षा मे मध्ये विद्यार्थ्यांना गुण सुधारण्याची संधी मिळावी यासाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) 'टू बोर्ड परीक्षा' धोरण लागू केले आहे. त्यानुसार यंदा दहावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे गुण सुधारण्यासाठी अतिरिक्त परीक्षा घेण्यात येणार आहे. ही परीक्षा मे महिन्यामध्ये होणार आहे.

## महाराष्ट्रावर अवकाळीचे सावट; ७ जिल्ह्यांना 'ऑरेंज' तर २७ जिल्ह्यांना 'यलो' अलर्ट

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** हवामान विभागाने १ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील ३३ जिल्ह्यांसाठी अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. पुणे, नाशिकसह ७ जिल्ह्यांत ऑरेंज अलर्ट असून, उर्वरित ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे.

मार्च महिन्यातील तडाख्यानंतर आता एप्रिलच्या सुरुवातीलाही वरुणराजा विश्रांती घेण्याच्या मनस्थितीत नाही. हवामान विभागाने १ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील तब्बल ३३ जिल्ह्यांसाठी पावसाचा इशारा जारी केला आहे. यामध्ये ७ जिल्ह्यांत पावसाचा जोर अधिक असल्याने 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला असून, उर्वरित जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

पुणे आणि सातारा जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. येथे ताशी ५० ते ६० किमी वेगाने वादळी वारे वाहतील. कोल्हापूर, सांगली आणि सोलापूरमध्ये मध्यम स्वरूपाच्या पावसासह काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे.



> "हवामान अस्थिर असल्याने गरज असल्यासच घराबाहेर पडा. झाडाखाली किंवा पत्राच्या शेडखाली आश्रय घेणे टाळा. शेतकऱ्यांनी आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी झाकून ठेवावा."
> – भारतीय हवामान विभाग (IMD)


नाशिक आणि अहिल्यानगरला (नगर) ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून, मराठवाड्यातील लातूर आणि धाराशिवमध्येही वादळाचा वेग अधिक असेल. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड या जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल. शेतकरी बांधवांनी काढणीला आलेल्या पिकांची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट आहे, तर नागपूर, अमरावतीसह इतर जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. कोकणात मुंबई-पालघरमध्ये केवळ ढगाळ वातावरण असेल, मात्र ठाणे, रायगड आणि रत्नागिरीत वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी लागेल.

ऑरेंज अलर्ट (अधिक धोका): पुणे, सातारा, नाशिक, अहिल्यानगर, लातूर, धाराशिव, यवतमाळ.

यलो अलर्ट (सतर्कता): ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव, धुळे, नंदुरबार, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, नागपूर, अकोला, अमरावती, वर्धा, गोंदिया, गडचिरोली, बुलढाणा, चंद्रपूर, भंडारा, वाशिम.

## दक्षिण तालुक्याला अवकाळीने झोडपले



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोमवारी रात्री साडेआठच्या सुमारास दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये वादळी वारा विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस झाला. विंचूर येथे नारळाच्या झाडावर वीज पडली.

विंचूर, शंकर नगर, मंद्रुप आहेरवाडी, सिंदखेड, राजुर, औराद, बिरनाळ, हत्तुर, होनमुर्गी, वडकबाळ, तेरा मेल, कारकल, माळकवठे, होटगी परिसरात विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस सुरू झाला. (पान 2 वर..)

## संपादकीय

# अर्थव्यवस्था संकटात

जगभरात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक अर्थव्यवस्था डळमळीत झाली असून त्याचे पडसाद भारतासारख्या विकसनशील देशांवर प्रकर्षाने उमटताना दिसत आहेत. मध्यपूर्वेत वाढलेले तणाव, विशेषतः अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष, यामुळे जागतिक बाजारपेठ अस्थिर झाली आहे. परिणामी इंधन दरवाढ, शेअर बाजारातील घसरण आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाचे सातत्याने अवमूल्यन हे गंभीर आर्थिक संकेत ठरत आहेत.

सोमवारी भारतीय रुपयाने डॉलरच्या तुलनेत ९५ रुपयांची नीचांकी पातळी गाठली. ही ऐतिहासिक घसरण असून, गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास आणि महागाई या दोन्हीवर त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत. २०१४ साली ५८-६० रुपयांच्या दरम्यान असलेला रुपया आज ९५ च्या घरात पोहोचला आहे, म्हणजेच सुमारे ५५ ते ६० टक्क्यांची घसरण. ही केवळ आकडेवारी नसून भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्थितीचे द्योतक आहे.

सत्तेत येण्यापूर्वी रुपयाच्या घसरणीवर कठोर टीका करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारलाही रुपया मजबूत करण्याचे आव्हान कायम आहे. काही देशांबरोबर डॉलरऐवजी रुपयात व्यवहार करण्याचे प्रयत्न झाले असले, तरी त्याचा प्रभाव मर्यादितच राहिला आहे.

जागतिक युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ ही भारतासाठी मोठी चिंता आहे. आयात-आधारित अर्थव्यवस्था असल्याने इंधनदरवाढ थेट महागाई वाढवते. त्यातच परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून पैसे काढून घेण्यास सुरुवात केल्याने बाजारावर अतिरिक्त दबाव निर्माण झाला आहे. एका महिन्यात रुपया सुमारे ४ टक्क्यांनी घसरला असून चालू आर्थिक वर्षात ही घसरण १० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे.

युद्धजन्य स्थिती कायम राहिल्यास रुपया ९८ पर्यंत घसरण्याची शक्यता अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. हे चित्र चिंताजनक आहे. रुपयाचे अवमूल्यन म्हणजे आयात खर्च वाढणे, महागाई वाढणे आणि सर्वसामान्यांच्या खिशावर ताण येणे होय.

या पार्श्वभूमीवर Reserve Bank of India ने काही धोरणात्मक उपाययोजना केल्या असल्या, तरी परिस्थिती नियंत्रणात आणणे सोपे नाही. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी भारतीय अर्थव्यवस्था इतर उदयोन्मुख अर्थव्यवस्थांपेक्षा सक्षम असल्याचा दावा केला असला, तरी वास्तवातील आव्हाने नाकारता येणार नाहीत.

आज गरज आहे ती ठोस आणि दूरदृष्टी असलेल्या आर्थिक धोरणांची. जागतिक परिस्थितीवर भारताचे नियंत्रण नसले, तरी अंतर्गत आर्थिक शिस्त, निर्यातवाढ, आयात नियंत्रण आणि गुंतवणूकदारांचा विश्वास परत मिळवणे हे सरकारसमोरचे मोठे आव्हान आहे.

एकूणच, जागतिक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था एका निर्णायक टप्प्यावर उभी आहे. योग्य वेळी योग्य निर्णय न घेतल्यास येणाऱ्या काळात याचे परिणाम अधिक गंभीर होऊ शकतात.

पान १ वरून

## रोहित पवार जागते रहो...!...

अशी चर्चा होणे योग्य नाही. सरकार या बाबत उदासिन का ? इतक्या मोठमोठ्या लोकांची नावे उघडपणे खून केला म्हणून घेतली जात असताना सरकार गप्प का ? माध्यमांनी या बाबतही आवाज उठवत रहायला हवं. जितकं महत्व अशोक खरात प्रकरणाला दिले जात आहे तेवढेच महत्व लोकांच्यात उपमुख्यमंत्र्याच्या मृत्यूबाबत सुरू असलेल्या चर्चेलाही द्यावं. त्याच्याही तशाच बातम्या कराव्यात असं वाटत. बाकी या प्रकरणाचा पाठपुरावा करणा-या रोहित पवार यांच्या हिम्मतीला दाद द्यावी लागेल. सुप्रिया सुळे मुख्यमंत्री दादाला शरण गेल्यासारख्या वाटत आहेत. त्या फडणवीसांना दाभोळकरांचा वारसदार ठरवत आहेत. नाशिक येथे होणा-या कुंभमेळ्यासाठी २५ हजार कोटींचा आराखडा मांडणा-या आणि शिक्षणासाठी वाटाण्याच्या अक्षदा वाटणा-या भटबावळ्या माणसाला सुप्रिया सुळे नरेद्र दाभोळकरांचा वारसदार ठरवतात तेव्हाच त्या शरण गेल्याचे लक्षात येते. एक तर त्या सत्तेला शरण गेल्या आहेत किंवा त्यांनी भांग प्यायला सुरूवात केली असावी असं या निमित्ताने वाटतं. शरण जाणारं माणूस किंवा भांग पिणारं माणूस लढू शकत नाही तेव्हा रोहित पवारांनीच ताकदीनं लढत अजित पवारांच्या मृत्यूचे सत्य बाहेर काढावं.

## दक्षिण तालुक्याला अवकाळीने...

याच दरम्यान, विंचूर शिवारातील गुरव वस्ती भागात असलेल्या एका उंच नारळाच्या झाडावर अचानक वीज पडली. वीज कोसळताच मोठा आवाज झाला, ज्यामुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले.

वीज पडल्याने नारळाच्या झाडाला आग लागली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. वस्तीवरील नागरिक सुरक्षित स्थळी असल्याने मोठा अनर्थ टळला. दक्षिण तालुक्यातील काही भागांत विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला. वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी पिकाचे नुकसान झाले आहे. यामध्ये गहू ज्वारी द्राक्ष आंबा पिकांचा समावेश आहे. वादळी वाऱ्यामुळे कैऱ्या मोठ्या प्रमाणात गळून पडल्या आहेत तर काही ठिकाणी द्राक्ष बागायतदारांनी बेदाणा शेडवर वाळत घातलेले बेदाणे ताडपत्री उडून गेल्यामुळे पावसाने भिजले आहेत. त्यामुळे या शेतकऱ्याची मोठी आर्थिक हानी झाली.

वादळी वाऱ्यामुळे विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता. दिवसभर ढगाळ वातावरण असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणावर उकाडा जाणवत होता मात्र संध्याकाळी साडेआठच्या सुमारास वादळीवारासह पावसाने हजेरी लावल्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्याने उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

# सोलापूरला वाटाण्याच्या अक्षता; नव्या बसेसपासून वंचित प्रवासी

राज्य सरकारने मोठ्या गाजावाजात राज्य परिवहन व्यवस्थेसाठी अत्याधुनिक 'राजमाता जिजाऊ' बसेसचा ताफा दाखल केला. या बसेस प्रवाशांसाठी अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज असल्याचे सांगण्यात आले. मात्र, या सर्व घोषणांमध्ये सोलापूर जिल्ह्याचा पूर्णपणे विसर पडल्याचे चित्र समोर आले आहे. तीन हजार बसेसपैकी एकही बस सोलापूरच्या वाट्याला न येणे ही केवळ प्रशासनिक चूक नसून, हा सरळसरळ अन्याय आहे.

सोलापूर हा प्रवासी संख्येच्या दृष्टीने महत्त्वाचा जिल्हा. ग्रामीण भाग मोठा असल्याने एसटी सेवेवरच बहुतांश नागरिक अवलंबून आहेत. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये आणि सणासुदीच्या काळात येथे प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. तरीही या जिल्ह्यात अजूनही जुन्या, डबघाईला आलेल्या बसेस धावताना दिसतात. अनेकदा या बसेस रस्त्यातच बंद पडतात, ज्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

परिवहनमंत्री सरनाईक यांनी सोलापूर बसस्थानकाची पाहणी करून गैरव्यवस्थेवर नाराजी व्यक्त केली होती. मात्र प्रत्यक्षात सुधारणा करण्यासाठी आवश्यक असलेल्या नव्या बसेसच जिल्ह्याला देण्यात आल्या नाहीत. ही विरोधाभासी भूमिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

राजमाता जिजाऊ बसेसमध्ये ५५ आसनांची व्यवस्था, पॅनिक बटण, सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस प्रणाली अशा आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. विशेषतः महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेवर भर देण्यात आला आहे. अशा सुविधा सोलापूरच्या प्रवाशांनाही मिळायला हव्या होत्या. मात्र सध्या तरी त्यांना या सुविधांपासून वंचित ठेवण्यात आले आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, या अन्यायाविरुद्ध स्थानिक लोकप्रतिनिधींची शांतता. सत्ताधारी असोत किंवा विरोधक-कोणीही ठामपणे आवाज उठवताना दिसत नाही. राजकारणातील कुरघोड्यांमध्ये अडकलेल्या नेत्यांना जनतेच्या मूलभूत गरजांकडे लक्ष देण्यासाठी वेळच उरलेला नाही, असेच या परिस्थितीतून दिसते.

सोलापूर परिवहन विभागाला दुसऱ्या टप्प्यात बसेस मिळतील, अशी आश्वासने दिली जात आहेत. मात्र, ही आश्वासने प्रत्यक्षात उतरतील का, याबाबत नागरिकांमध्ये संशय आहे. दरम्यान, प्रवाशांची रोजची होणारी गैरसोय मात्र कायम आहे.

या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत सरकारकडे ठाम भूमिका मांडणे आवश्यक आहे. सोलापूरसारख्या मोठ्या जिल्ह्याला दुर्लक्षित ठेवणे परवडणारे नाही. प्रवाशांच्या सुरक्षित आणि सुसह्य प्रवासासाठी लवकरात लवकर नव्या बसेस उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे. अन्यथा, 'विकासा'च्या घोषणा आणि वास्तवातील परिस्थिती यातील दरी अधिकच वाढत जाईल-आणि सोलापूरकरांना वाटाण्याच्या अक्षताच मिळत राहतील.

# पर्यावरण आणि अर्थकारणाचा संगम

देशातील वाढती बेरोजगारी ही गंभीर समस्या बनत चालली असताना, रोजगाराच्या नव्या संधी शोधण्याची गरज अधिक प्रकर्षाने जाणवत आहे. पारंपरिक उद्योगांबरोबरच पर्यावरणपूरक आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांकडे वळल्यास रोजगार निर्मितीला चालना मिळू शकते. अशाच एका अभिनव उपक्रमातून जलाशयांमध्ये आढळणाऱ्या टाकाऊ जलपर्णीपासून रोजगारनिर्मितीचा मार्ग खुला होताना दिसत आहे.

पुण्यात काही उद्योजकांनी जलपर्णीपासून टिकाऊ आणि पर्यावरणपूरक पादत्राणे, कापड, बॅगा यांसारख्या वस्तू तयार करण्याचा उद्योग सुरू केला आहे. विशेष म्हणजे या उद्योगात महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असून, त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला हातभार लागत आहे. केळीच्या खोडासारख्या टाकाऊ कृषी अवशेषांचा वापर करून तयार होणाऱ्या उत्पादनांना देशभरातून मागणी वाढत आहे.

प्लास्टिकमुळे वाढणारे प्रदूषण आणि पर्यावरणीय असंतुलन लक्षात घेता अशा पर्यावरणपूरक उत्पादनांची गरज आज अधिक आहे. जलपर्णी ही सामान्यतः त्रासदायक वनस्पती मानली जाते. तलाव, नद्या आणि जलाशयांमध्ये ती मोठ्या प्रमाणात वाढून पाण्याचा प्रवाह अडवते. त्यामुळे तिचे निर्मूलन करण्यासाठी दरवर्षी लाखो रुपये खर्च केले जातात.

सोलापूरमधील छत्रपती संभाजी आणि हिप्परगा तलावांमध्येही जलपर्णीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळते. महापालिकेकडून ती काढण्यासाठी मोठा खर्च केला जातो, मात्र काही दिवसांत ती पुन्हा वाढते. या समस्येकडे केवळ खर्चिक उपाय म्हणून पाहण्याऐवजी, रोजगारनिर्मितीची संधी म्हणून पाहण्याची गरज आहे.

पुणे आणि मुंबईतील उद्योजकांच्या धर्तीवर सोलापूरमध्येही जलपर्णीवर आधारित उद्योग उभारले जाऊ शकतात. सोलापूर हे कामगारांचे शहर असल्याने येथे अशा उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ सहज उपलब्ध होऊ शकते. ग्रामीण व शहरी भागातील महिलांसाठीही हे एक उत्तम रोजगाराचे साधन ठरू शकते.

या दृष्टीने महापालिका, जिल्हा परिषद आणि इतर शासकीय संस्थांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिल्यास हा उद्योग मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. आसामसारख्या राज्यांमध्ये जलपर्णीपासून विविध उत्पादने तयार करून रोजगारनिर्मितीचे यशस्वी प्रयोग सुरू आहेत. त्याचे अनुकरण महाराष्ट्रात, विशेषतः सोलापूरमध्ये होणे गरजेचे आहे.

एकूणच, टाकाऊ मानल्या जाणाऱ्या जलपर्णीसारख्या वनस्पतीतूनही नवे उद्योग उभे राहू शकतात, हे या उपक्रमातून स्पष्ट झाले आहे. योग्य नियोजन आणि प्रशासनाचा पाठिंबा मिळाल्यास पर्यावरण संवर्धनासोबतच आर्थिक विकासाचा मार्गही सुकर होऊ शकतो. सोलापूरने या संधीचा लाभ घेतला, तर 'कचऱ्यातून संपत्ती' निर्माण करण्याचा आदर्श उभा राहू शकतो.

# वाशिंबेतील भैरवनाथ यात्रा उत्सव प्रारंभ



**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातील जागृत देवस्थान म्हणून वाशिंबे येथे भीमा नदी काठावर वसलेले प्राचीन भैरवनाथ मंदिर आहे. यात्रा उत्सवाच्या धार्मिक विधी कार्यक्रमास सुरुवात झाली. तीन दिवसीय कालावधीत उत्सव पार पडणार आहे. दि.२ एप्रिल रोजी रात्री बारा पासून दंडवत, अभिषेक, हरिभजन, हनुमान जन्मोत्सव जागर, भैरवनाथ मंदिर येथे रात्री भाविकांची भक्त मानाच्या कावडीची गावातील चौकात सवाद्य मिरवणूक, भैरवनाथ महाराज व जोगेश्वरी आईसाहेब विवाह कार्यक्रम व दि.३ एप्रिल रोजी सकाळपासून देवाचा घोड्यांवरील छबिना पालखी पारंपरिक सवाद्य, ढोल, सनई सह भव्य सुंदर मिरवणूक सोहळा, दुपारी वाजता महाआरती होऊन यात्रा उत्सव संपन्न होत आहे. दु.४ ते ७ यावेमध्ये भैरवनाथ मंदिर परिसरात महाराष्ट्र चॅम्पियन नामवंत मल्ल यांचा भव्य कुस्ती आखाडाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमाचे नियोजन भैरवनाथ मंदिर ट्रस्ट, बलुतेदार मंडळ समस्त ग्रामस्थ यांच्यावतीने केले आहे.

# राज्यस्तरीय टॅलेंट सर्च परीक्षेत अमरसिंह तळेकर राज्यात अकरावा

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** अकोले (खुर्द), ता. माढा (वार्ताहर) महाराष्ट्र टॅलेंट सर्च (MTS) या राज्यस्तरीय परीक्षेत अकोले (खुर्द) येथील बबनरावजी शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत राज्यभरात आपली ठळक छाप पाडली आहे. विशेष म्हणजे चि. अमरसिंह चंद्रकांत तळेकर याने राज्यात अकरावा क्रमांक मिळवत सोलापूर केंद्रात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे.

या परीक्षेत विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनीही उत्कृष्ट यश मिळवले आहे. कु. वेदिका मनोज देशमुख हिने राज्यात सतरावा क्रमांक मिळवत सोलापूर केंद्रात तृतीय स्थान पटकावले. तसेच चि. संग्राम बाळासाहेब कदम याने राज्यात सोळावा व सोलापूर केंद्रात चौथा क्रमांक मिळवला. याशिवाय, यशवंत प्राथमिक विद्यामंदिरच्या प्राथमिक विभागातील चि. शिवांश अतुल डोके याने इयत्ता चौथीत राज्यात तेरावा व सोलापूर केंद्रात द्वितीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली.

दि. २५ जानेवारी २०२६ रोजी जळगाव येथून घेण्यात आलेल्या या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, या यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक धनुसिंग रजपूत यांचे विशेष कौतुक होत आहे.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजयमामा शिंदे, सचिव तथा प्राचार्य मा. राजेंद्र ठोंबरे, प्राचार्या सौ. मधुरा सुरवसे, तसेच प्राथमिक विभागाच्या नेवसे आणि सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# 'मिशन लक्ष्यवेध' योजनेतर्गत खेळाडूंनी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाकरिता ह्यमिशन लक्ष्यवेधह्न हा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आलेला असून, या योजनेंतर्गत ॲथलेटिक्स, कुस्ती आणि लॉन टेनिस या तीन खेळांचे अनिवासी जिल्हास्तरावर प्रतिभा विकास केंद्र सुरु करण्यास मान्यता मिळाली आहे.

या केंद्राअंतर्गत प्रत्येकी 20 खेळाडूंची निवड करण्यात येणार असून, पात्र खेळाडूंनी आपले अर्ज दिनांक 15 एप्रिल 2026 पर्यत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कुमठा नाका, सोलापूर येथे प्रत्यक्ष सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले.

### पात्रता निकष

- वयोमर्यादाः 21 वर्षाखालील मुले/मुली (31 डिसेंबर 2026 रोजी)
- कागदपत्रेः जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, मागील 2 वर्षातील क्रीडा कामगिरीचे प्रमाणपत्र, 3 पासपोर्ट साईज फोटो, बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकांचे संमतीपत्र इ.
- अधिवासः महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असणे आवश्यक

### क्रीडा कामगिरीः

- ॲथलेटिक्स व कुस्ती - राज्यस्तरावरील सहभाग किंवा पदक प्राप्त खेळाडू
- लॉन टेनिस - AITA रॅंकींगमध्ये प्रथम तीन क्रमांक, राज्यस्तरावरील रॅंकींग किंवा पदक प्राप्त खेळाडू
- वैद्यकीय तपासणीः शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे वैध फिटनेस प्रमाणपत्र आवश्यक

### सुविधा

निवड झालेल्या खेळाडूंना अनिवासी क्रीडा प्रशिक्षण, पायाभूत सुविधा, क्रीडा साहित्य, स्पर्धांचे आयोजन, स्पोर्ट्स सायन्स सेंटर, करिअर मार्गदर्शन, क्षमता विकास कार्यक्रम, पुरक आहार खर्च, देशांतर्गत/विदेशातील स्पर्धा सहभाग खर्च, वैद्यकीय उपचार व विमा सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. जास्तीत जास्त पात्र खेळाडूंनी या योजनेत अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कुमठा नाका, सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

# '१०८ कोटींच्या प्रकल्पाला वेग; अक्कलकोटला आधुनिक रुग्णालयाची भेट'



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :** अक्कलकोट येथे उभारण्यात येत असलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम वेगाने सुरू असून ही अत्याधुनिक सुविधा लवकरच नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहे. या प्रकल्पामुळे अक्कलकोटसह परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळणार असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

तालुक्यातील नागरिकांना सुसज्ज व आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने विद्यमान ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सातत्याने पाठपुरावा करत तब्बल १०८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे.

धार्मिक आणि ऐतिहासिक ओळख असलेल्या अक्कलकोटमध्ये श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर येथे दररोज हजारो भाविकांची वर्दळ असते. तसेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमेलगतचा हा तालुका, राष्ट्रीय महामार्गांची जोड आणि शेती बाजारपेठेतील हालचाली यामुळे येथे कायम गर्दी असते. परिणामी अपघातांचे प्रमाण वाढत असून, ग्रामीण भागातील नागरिकांना तातडीच्या आणि दर्जेदार आरोग्य सेवांचा अभाव जाणवत होता.

सध्या कार्यरत असलेल्या ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयात आवश्यक सुविधा अपुऱ्या पडत असल्यामुळे रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन शासनाने रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय घेतला.

नवीन रुग्णालयात अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, प्रशस्त वॉर्ड, तसेच प्रशिक्षित डॉक्टर व आरोग्य कर्मचारी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यामुळे अक्कलकोट आणि परिसरातील नागरिकांना वेळेवर व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळणार आहे.

### दर्जेदार सुविधांसाठी प्रयत्न

'अक्कलकोटमध्ये आधुनिक आणि दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय लवकरात लवकर सुरू करण्यासाठी कामाला गती देण्यात आली आहे,' असे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

# हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' मोहिमेला वेग - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकाबार्माझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून हत्तीरोगाचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विशेषतः दुर्लक्षित असलेल्या हत्तीरोगासारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्र राज्यात विशेषतः विदभार्तील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र सरकारकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदभार्तील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, देशातून हत्तीरोग निर्मूलन करण्याच्या प्रधानमंत्री यांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

### राज्यात ५५ लाख नागरिकांना औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते.

महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे.

### नागपूर ग्रामीण भागात मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश

महाराष्ट्रातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टक्के रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत. सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हेः भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.

ट्रीपल ड्रग पॉलिसी (आयडीए) यशाचा दरः नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर (एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

## वात्रटिका

### तारे तोडले

बोलण्या आधी थोडे
नयन उघडा मुनीश्वरा...
शौर्य धैर्य मांडताना तरी
इतिहास सांगा खराखुरा...
धर्म कधीच वाईट नाही पण
धर्मात ओढू नका कोणाला...
इतिहासातील अढळ तारा
नेमकीच दिसली तुम्हाला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# श्रीकांत ढवण यांना राज्यस्तरीय सामाजिक क्षेत्रातील गौरव पुरस्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल श्रीकांत ढवण यांना 'राज्यस्तरीय सामाजिक क्षेत्रातील गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. राष्ट्रीय लोकराज्य न्यूज मीडिया यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी कृषिमंत्री दत्तामामा भरणे, सिनेअभिनेते महेशदादा देवकाते पाटील, ब्रिगेड महाराष्ट्रच्या अध्यक्षा तृप्ती देसाई, तसेच सिनेअभिनेत्री भारती जीभकाटे आणि रिया खुरपडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमात श्रीकांत ढवण यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत समाजासाठी केलेल्या योगदानाचे अभिनंदन केले.

यावेळी श्रीकांत ढवण यांनी हा सन्मान स्वीकारताना कृतज्ञता व्यक्त केली. तसेच राहुल कुदनर (संपादक, राष्ट्रीय लोकराज्य न्यूज) आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष आभार मानले.

कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभल्याने सोहळा उत्साहात पार पडला.

# 'एनटीपीसी स्पर्धेत आहेरवाडीचा जलवा, विजेतेपदावर शिक्कामोर्तब!'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** NTPC Limited सोलापूरच्या वतीने कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (उरफ) उपक्रमांतर्गत आयोजित ग्रामीण क्रिकेट स्पर्धेत आहेरवाडी संघाने शानदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. आहेरवाडी, फताटेवाडी, होटगी स्टेशन आणि तिल्लेहाळ या गावांतील युवकांनी या स्पर्धेत उत्साहाने सहभाग नोंदवला.



ग्रामीण भागातील युवकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्यात क्रीडा भावना विकसित करणे तसेच परस्पर सहकार्य, समन्वय आणि सामाजिक सलोखा वाढवणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.

स्पर्धेचे उद्घाटन एनटीपीसीचे कार्यकारी संचालक बी. जे. सी. शास्त्री यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी क्रीडाचे महत्त्व अधोरेखित करत, 'अशा स्पर्धांमुळे युवकांच्या शारीरिक व मानसिक विकासाबरोबरच समाजात एकता आणि बंधुत्वाची भावना दृढ होते,' असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाला महाव्यवस्थापक एम. के. बेबी (संचालन व देखभाल), महाव्यवस्थापक सुभाषिस बंदोपाध्याय (देखभाल व अतिरिक्त प्रशासन अधिकारी) यांच्यासह एनटीपीसीचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी तसेच विविध गावांचे सरपंच आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेतील अंतिम सामन्यात फताटेवाडी संघाने प्रथम फलंदाजी करत १२ षटकांत १०५ धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना आहेरवाडी संघाने दमदार खेळ करत १०६ धावा पूर्ण करून सामना जिंकला आणि विजेतेपदावर आपले नाव कोरले.

समारोप सोहळ्यात विजेत्या आहेरवाडी संघासह उपविजेत्या फताटेवाडी संघाचा सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी एनटीपीसी सोलापूरच्या या उपक्रमाचे कौतुक करत, ग्रामीण युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा स्पर्धा भविष्यातही सातत्याने आयोजित कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# बार्शीत अभय योजनेला प्रतिसाद; २३.७० कोटींची कर वसुली

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाने घरपट्टी व नळपट्टीवरील दंडव्याज शंभर टक्के माफ करण्याचा निर्णय घेतल्यानंतर बार्शी नगरपरिषदेच्या कर विभागात नागरिकांची मोठी गर्दी उसळली. अभय योजनेच्या पार्श्वभूमीवर थकीत कर भरण्यासाठी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने नगरपरिषदेच्या महसुलात मोठी वाढ झाली आहे.

अभय योजनेच्या अंतिम टप्प्यात ३० व ३१ मार्च या दोन दिवसांतच सुमारे १ कोटी २५ लाख रुपयांची वसुली झाली. यामध्ये सोमवारी अंदाजे ७० लाख तर मंगळवारी सुमारे ५५ लाख रुपये रोख स्वरूपात जमा झाले. धनादेशाद्वारे मिळालेल्या रकमेचा यात समावेश नसून, ती रक्कम जमा झाल्यानंतर वसुलीचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

कर अधिकारी विठ्ठल पाटोळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अभय योजनेअंतर्गत आतापर्यंत एकूण २३ कोटी ७० लाख रुपयांची वसुली झाली असून, ती सुमारे ८७ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. धनादेशांची रक्कम जमा झाल्यानंतर हा आकडा २४




कोटींच्या घरात जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी मुख्याधिकारी तैमूर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली कर विभागाने विशेष प्रयत्न केले. उपमुख्याधिकारी राजाराम नरुटे, वाहन विभाग प्रमुख नागनाथ गायकवाड तसेच कर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा करत वसुली वाढवली.

शेवटच्या दिवसांत वाढलेल्या गर्दीचे योग्य नियोजन करून नागरिकांना सुरळीत सेवा देण्यासाठी अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली होती. अभय योजनेला मिळालेल्या प्रतिसादामुळे प्रलंबित कर वसुलीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागला असून, नगर प्रशासनासाठी ही मोहीम अत्यंत यशस्वी ठरल्याचे मानले जात आहे.

# 'परिवहन अंदाजपत्रक मंजूर, पण बस खरेदीवर प्रश्नचिन्ह'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका परिवहन उपक्रमाच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या ६४ कोटी ५० लाख रुपयांच्या अंदाजपत्रकाला महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत एकमताने मंजुरी देण्यात आली. महापौर विनायक कोंडयाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत हा निर्णय घेण्यात आला.

सभागृहनेते नरेंद्र काळे यांनी अंदाजपत्रक मांडले. यापूर्वी स्थायी समितीने त्यास मंजुरी दिली होती. परिवहन समिती अद्याप स्थापन न झाल्याने प्रशासनाकडून आलेले अंदाजपत्रक स्थायी समितीत मंजूर करून पुढील शिफारसीसाठी सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात आले होते. त्यानुसार स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांनी अंदाजपत्रक सभागृहात मांडले.

विरोधी पक्षाकडून कोणतीही उपसूचना न आल्याने अंदाजपत्रकाला एकमताने मंजुरी देण्यात आली. यामध्ये गतवर्षीच्या ५९ कोटी ३१ लाख रुपयांच्या तुलनेत यंदा ५ कोटी १९ लाख रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

### बसेसची संख्या वाढणार; ई-बसेसचा समावेश

परिवहन उपक्रमात सध्या १० ते १२ बसेस धावत असताना, नव्या अंदाजपत्रकात ही संख्या ३५ पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव आहे. तसेच २०२६-२७ मध्ये केंद्र शासनाकडून पहिल्या टप्प्यात ३० ई-बसेस उपलब्ध होणार असून, एकूण बसेसची संख्या ४० पेक्षा अधिक होणार असल्याचे नमूद करण्यात आले



आहे. यामुळे उत्पन्नात वाढ होऊन प्रवाशांना अधिक सुविधा मिळणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.

### महापालिकेकडून अनुदानाचा आधार

परिवहन विभागाला यापूर्वी महापालिकेकडून १४ कोटी रुपयांचे अनुदान मिळाले होते. चालू आर्थिक वर्षात १७ कोटी ३२ लाख ८० हजार रुपयांचे अतिरिक्त अनुदान अपेक्षित असल्याचेही अंदाजपत्रकात नमूद आहे.

### सदस्यांकडून विविध मुद्द्यांवर प्रश्न

अंदाजपत्रकावर चर्चेदरम्यान विविध पक्षांच्या सदस्यांनी महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले. शिवसेनेचे अमोल शिंदे आणि काँग्रेसचे चेतन नरोटे यांनी बस खरेदीतील कथित अनियमितता, तसेच यापूर्वी खरेदी केलेल्या शंभर बसेसच्या चेसिस क्रॅक प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली.

तसेच परिवहन समिती अद्याप स्थापन का करण्यात आलेली नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. बस खरेदी प्रक्रियेत भ्रष्टाचार झाल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला.

**जमेची बाजू (एकूण ६४.५० कोटी)**

* आरंभी शिल्लक : १ लाख
* वाहतूक विभाग : ६.४७ कोटी
* कर्मशाळा विभाग : ८१ लाख
* महापालिकेकडून आर्थिक सहाय्य : १७.३२ कोटी
* पीएमईव्ही बसेस उत्पन्न : १४.७१ कोटी
* शासन अनुदान : २३.७४ कोटी
* ॲडव्हान्स व डिपॉझिट : १.४० कोटी
* बँक व्याज : १ लाख

**खर्चाची बाजू (एकूण ६४.५० कोटी)**

* डिझेल विभाग : ४ कोटी
* कर्मशाळा विभाग : १.३९ कोटी
* वाहतूक विभाग : १४.०२ कोटी
* ड्युटी क्लार्क : ५.६४ कोटी
* पेन्शन विभाग : ८.०५ कोटी
* पीएफ/कर/ईएसआय : २.५२ कोटी
* स्टेशनरी : १३.५० लाख
* सभापती खर्च : १७ लाख
* लेखा विभाग : ५८ लाख
* विधी विभाग : ५४ लाख
* थकीत देणी : २६.१६ कोटी
* इतर खर्च व शिल्लक : उर्वरित रक्कम

# उन्हाळ्यात भाजीपाल्याची आवक वाढली
## दरात घसरण, लिंबू-लसूण महाग

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ऐन उन्हाळ्यात श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे पालेभाज्या आणि फळभाज्यांची मोठ्या प्रमाणात आवक वाढल्याने त्यांच्या दरात लक्षणीय घसरण झाली आहे. गवार, हिरवी मिरची व ढोबळी मिरची वगळता बहुतांश भाजीपाल्याचे दर कमी झाल्याचे चित्र बाजारात दिसून येत आहे.



गेल्या काही दिवसांपासून टोमॅटोचे दर घसरलेलेच असून शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. मंगळवारी सुमारे १८५ क्विंटल टोमॅटोची आवक झाली असून त्याला प्रतिक्विंटल ७०० ते १००० रुपये दर मिळाला. वांग्याच्या दरातही घट झाली असून १२०० ते २००० रुपये प्रतिक्विंटल दर मिळत आहे. कोबी व फ्लॉवरची आवक वाढल्याने त्यांच्या दरातही घसरण झाली आहे.

दुसरीकडे लसूण आणि भेंडीचे दर वाढले आहेत. सुका लसूण ७००० ते १४ हजार रुपये प्रतिक्विंटल दराने विक्री होत असून भेंडीच्या दरात सुमारे १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. काकडीच्या दरात मात्र सुमारे ३० टक्क्यांनी घट नोंदवली गेली आहे.

ढोबळी मिरचीची आवक कमी असल्याने दरात वाढ झाली आहे. किरकोळ बाजारात ती ७० ते ८० रुपये किलो दराने विकली जात असून बाजार समितीत प्रतिक्विंटल ५ हजार रुपयांपर्यंत दर मिळत आहे. मंगळवारी तिची आवक केवळ ६ क्विंटल इतकी होती.

बाजार समितीत ९०० क्विंटल बटाट्याची आवक झाली असून बटाटा ९०० ते १३०० रुपये प्रतिक्विंटल दराने विक्री होत आहे. कांद्याच्या दरातील घसरण कायम असून कांदा ६०० ते १५५० रुपये प्रतिक्विंटल दराने विकला जात आहे.

उन्हाळ्यामुळे लिंबूच्या मागणीत वाढ झाल्याने त्याचे दरही वाढले आहेत. लिंबू ६००० ते १२,५०० रुपये प्रतिक्विंटल दराने विक्री होत आहे. किरकोळ बाजारात कोथिंबीर, मेथी, शेपू, चुका व पालक या पालेभाज्या ८ ते १० रुपये प्रतिपेंढी दराने उपलब्ध आहेत.

### फळबाजारात आंब्याचा दर 'हाय'

सोलापूरच्या बाजारात हापूस आंबा दाखल झाला असला तरी त्याचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आहेत. रत्नागिरी हापूस आंब्याची पेटी ५००० ते ७००० रुपये दराने विकली जात आहे.

दरम्यान, कलिंगड, खरबूज, द्राक्ष, चिकू व मोसंबी यांची बाजारात रेलचेल वाढली आहे. मात्र डाळिंब व सफरचंदाचे दर उच्च पातळीवर असून डाळिंब २५० ते ३०० रुपये किलो, तर सफरचंद सुमारे २०० रुपये किलो दराने विकले जात आहे.

# ज्येष्ठांनी समाजाला दिशा दाखवावी- कुंभार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ज्येष्ठ नागरिकांनी समाजसेवक म्हणून कार्य करावे. आपल्या अनुभवाचा उपयोग समाजाला योग्य दिशा दाखवणारे असावे असे प्रतिपादन फेस कॉम पुणेचे अध्यक्ष हनुमंत कुंभार यांनी केले.

शेळगी येथील समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने समाजातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला यावेळी कुंभार बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिद्धया स्वामी हिरेमठ होते. वीरशैव लिंगायत समाज सोलापूरच्या जिल्हाध्यक्षपदी चंद्रकांत रमणशेट्टी यांची निवड झाल्याबद्दल, सुरेश हत्ती यांना लिंगायत समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल, वीरशैव लिंगायत समाजाच्या शहर अध्यक्षपदी शिवानंद धुत्तरगी यांची निवड झाल्याबद्दल,मल्लिनाथ शहाबादे, सुरेश चिक्कळी व आनंद करवंदे यांची सोलापूर जनता सहकारी बँकेवर संचालक म्हणून निवड झाल्याबद्दल तसेच सर्पमित्र संतोष बगले आदी मान्यवरांचे सत्कार करण्यात आला तसेच संघातील सदस्यांचे वाढदिवस संघाकडून साजरा करण्यात आला. यावेळी संघाचे अध्यक्ष शिवलिंगप्पा शहाबादे, सचिव सुनील पुजारी, सहसचिव अंबादास बिराजदार, कोषाध्यक्ष शरणाप्पा यारगले,संचालक विश्वनाथ कल्याणशेट्टी. संचालक काशिनाथ मेलगिरी, संचालक विजयराव काटोलकर, संचालिका कस्तुरी अक्कलकोटे तसेच कार्यकारी मंडळ व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक खानापुरे यांनी केले तर संघाचे सहसचिव अंबादास बिराजदार यांनी आभार मानले.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या नाम फलकाचे उदघाटन

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवस्थान लगतच्या जागेवर श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या नाम फलकाचा उदघाटन सोहळा संपन्न झाला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचा विकासाचा चढता आलेख हा स्वामीभक्त केंद्रस्थानी ठेऊन वाढत चालला असून, याचाच एक भाग ह्या उदघाटन सोहळ्याचा आहे.



दरम्यान मान्यवरांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे व जागेचे पूजन करण्यात आले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने नुकतीच श्री मल्लिकार्जुन देवस्थानच्या लगत जागेची खरेदी केली असून, श्री मल्लिकार्जुन यात्रेचे औचित्य साधून, बुधवारी श्री मल्लिकार्जुन देवस्थान समिती, नंदिकोल मानकरी परिवार, श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे पुजारी वर्ग, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे पदाधिकारी व सदस्य व सदभक्तांच्या उपस्थितीत मंडळाच्या नामफलकाचा उदघाटन सोहळा संपन्न झाला. स्वामी भक्त व स्वामी कायासाठी मंडळाने सदरची जागा घेतलेली आहे. श्री क्षेत्र अक्कलकोट ला श्री स्वामी समर्थांच्या दर्शनसाठी स्वामी भक्तांची वाढत चाललेली गर्दी पाहता, त्या प्रमाणात सोयी-सुविधा उपलब्ध होण्याकामी व स्वामी कार्यासाठी अन्नछत्र मंडळाने महत्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे.

या सोहळ्यास विरक्त मठ, अक्कलकोटचे म.नि.प्र. बसवलिंग महास्वामीजी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, अतुल बऱ्हाणपूरे, श्री मल्लिकार्जुन देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष शिवलिंग स्वामी, प्रथमेश इंगळे, विश्वस्त प्रकाश उण्णद, स्वामिनाथ हिप्परगी, बसलिंगप्पा खेडगी, महेश हिंडोळे, राजशेखर नागुरे, प्रा. विजयकुमार लिंबीतोटे, शिवकुमार कापसे, प्रशांत लोकापुरे, यांच्या सह नंदिध्वजाचे मानकरी पाटील, रोडगे, नंदिकोले, अडवितोटे, लिंबीतोटे परिवार, श्री स्वामी समर्थ समाधी मठ, बुधवार पेठ चोळप्पा महाराजांचे वंशज धनंजय पुजारी, अप्पू महाराज पुजारी, अन्नछत्र मंडळाचे पुरोहित अप्पू पुजारी, सुधाकर पुजारी, संदेश पुजारी, अनुप पुजारी अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, अरविंद शिंदे, डॉ.विनायक बुदले, इंजी. किरण पाटील, अशोकराव उटगे, अक्कलकोट कृषीउत्पन्न बाजार समिती चे उपसभापती अप्पासाहेब पाटील, शिवराज स्वामी,सुनील गोरे,रुद्रय्या स्वामी, रोहित खोबरे, सौरभ मोरे, दयानंद रोडगे, नगरसेवक अविनाश मडीखांबे, नागेश कुंभार, बाळा शिंदे, सिद्धेश्वर मोरे, प्रवीण देशमुख, मनोज निकम, सिद्धेश्वर टाके, निखील पाटील, विश्वनाथ मोडगी, गजानन पाटील, बाबा सुरवसे, नीलकंठ कापसे, विलास कोरे, मल्लिनाथ आळगी, धरेश्वर उण्णद, नन्नु कोरबू, सनी सोनटक्के, अतिश पवार, वैभव मोरे, विशाल कलबुर्गी, योगेश पवार, सागर जाधव, प्रसाद मोरे, ॲड. फहीम पिरजादे, प्रवीण घाटगे, बाळासाहेब पोळ, धनंजय गडदे, गोटू माने, सिद्धेश्वर माळी, रोहन शिर्के, रोहित मोरे, प्रदीप बणजगोळ, गणेश होटकर, राजू म्हेत्रे, बसवराज जकापुरे, इरण्णा मठपती, कुणाल भालेकर, ज्ञानेश्वर भोसले, सर्फराज शेख, श्री चव्हाण, दत्ता माने, बुडण तांबोळी, सागर गोंडाळ, व्यंकट स्वामी, नागेश बिराजदार, बालाजी कटारे, श्रीशैल कुंभार, सचिन शिंदे, सुभाष पेटकर, समर्थ चव्हाण, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, राजू पवार, राजू पाटोळे, धनंजय गडदे, चेतन शिंदे,नुर खासबागदार, इमाम इटकर, कांत झिपरे ,राहुल इंडे, तानाजीराव पाटील,शरदराव भोसले, लक्ष्मण बिराजदार, गोविंदराव शिंदे, यांच्या सह भक्त गण व अन्नछत्र मंडळाचे पदाधिकारी, सेवेकरी, कर्मचारी वृंद, अमोलराजे भोसले मित्र परिवार बहुसंख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेचा लाभ द्या- किरण भांगे

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना राबविली जाते. या योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषा कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या मृत्यू पश्चात वारसांना एक रकमी 20,000/- रुपये अर्थसहाय्य पुरवले जाते.परंतु आर्थिक वर्ष 2023 पासून मार्च 2026 पर्यंत सदर योजनेसाठी निधी केंद्राकडून उपलब्ध झाला नाही असे किरण भांगे यांनी सांगितले.

पुढे बोलताना भांगे म्हणाले तहसीलदार कार्यालय यांचेकडे चौकशी केली असता ग्रँड उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते. माळशिरस तालुक्यातील एकूण 15 अर्जदारांची मंजूर प्रकरणे निधीविना प्रलंबित आहेत.तरी सदर योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची क्रांतीमित्र सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण



भांगे यांनी लक्ष्मन कसेकर महसूल जिल्हाधिकारी,सोलापूर यांना भेटून निवेदनाद्वारे मागणी केली आहे. अन्यथा आगामी काळात 'भीक मांगो आंदोलना'चा इशाराही देण्यात आला आहे. एकीकडे सरकार लाडक्या बहिणीसाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करत आहे परंतु विधवा भगिनींसाठी शासनाकडे निधी नाही का ? असा सवाल किरण भांगे यांनी उपस्थित केला आहे. यावेळी केशव लोखंडे, महेश बिस्किटे उपस्थित होते.

# पंढरपूर पंचायत समितीस उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांची भेट

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी आज सकाळी 9.45 वाजता पंढरपूर पंचायत समितीस भेट दिली. 31 मार्च च्या कामाच्या व्यापानंतरही पंचायत समितीचे सर्व कर्मचारी वेळेत हजर असल्याचा प्रत्यय उपाध्यक्ष पवार यांना आला.

पंढरपूर पंचायत समितीस उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी भेट देऊन आषाढी यात्रा व पंचायत समिती मधील विकास कामांची माहिती व आढावा घेतला. या प्रसंगी उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांचे स्वागत गटविकास अधिकारी अमोल जाधव यांनी केले. या वेळी उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी पंचायत समिती परिसराची पाहणी केली. गटविकास अधिकारी अमोल जाधव यांनी राबविलेले



विविध नाविन्यपूर्ण उपक्रमाची पाहणी केली. क्लीन व ग्रीन उपक्रम राबवून पंचायत समिती हरित केली आहे. परिसराची स्वच्छता व वृक्षारोपण पाहून उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी पंचायत समितीचे कौतुक केले.

उपाध्यक्ष पवार यांनी घेतले विठ्ठलाचे दर्शन . ! जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरात जाऊन श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे दर्शन घेतले. या प्रसंगी मंदिर समितीचे विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार यांनी मंदिर समितीच्या वतीने उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांचे महावंस्त्र देऊन स्वागत केले. गटविकास अधिकारी अमोल जाधव, पंचायत समितीचे अधिक्षक शहाजहान तांबोळी, भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष विनायक सुतार, भारतीय जनता पार्टी उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष संभाजी दडे उपस्थित होते.

# क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या जयंती वर्षानिमित्त वर्षभर कार्यक्रम आयोजित करावेत- मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ हा कालावधी द्विशताब्दी जयंती वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. या द्विशताब्दी वर्षानिमित्त त्यांचे कार्य, विचार पुढील पिढीपर्यंत प्रभावीपणे नेण्याची संधी असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्यावर आधारित विविध कार्यक्रमांची वार्षिक दिनदर्शिका बनवून वर्षभर कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्याचे निर्देश दिले. मंत्रालयात आयोजित क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे



करण्यासाठी गठीत समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, इमाव बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गठीत समितीमध्ये संलग्नित विभागाने किमान दोन ते तीन कार्यक्रमांचे आयोजन करावे. अशा प्रेरक कार्यक्रमांचे नियोजन १५ एप्रिल पर्यंत देण्यात यावे. महात्मा जोतिराव फुले यांचे मूळ गाव खानवडी (ता. पुरंदर, जि. पुणे) येथील त्यांच्या स्मृती जपणाऱ्या जिल्हा परिषद शाळेचा कायापालट करण्यात आला आहे. या द्विशताब्दी जयंती वर्षाची सुरुवात ११ एप्रिल रोजी सीबीएससी शिक्षण, आधुनिक सुविधांनी युक्त खानवडी जिल्हा परिषद शाळेच्या लोकार्पण कार्यक्रमाने करावी. यासाठी गठीत मंत्री समितीच्या अंतर्गत वर्षभर कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करणे, या कार्यक्रमांचे संनियंत्रण करण्यासाठी उपसमितीची निर्मिती करावी. महात्मा जोतिराव फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित असलेल्या साहित्य संपदेचा बहुभाषेत अनुवाद झाला पाहिजे. जेणेकरून सबंधित भाषिक नागरिकांना त्यांच्या भाषेत साहित्य उपलब्ध होईल. शालेय शिक्षण विभागाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये खासगी शाळांनाही सहभागी करून घ्यावे. प्रत्येक मंत्री, विभागाने दिलेल्या सूचनांचे एकत्रीकरण करून त्यावर आवश्यक कार्यवाही करावी. यावेळी सबंधित मंत्री यांनी आपल्या विभागाकडील नियोजनाची माहिती दिली. तसेच हे द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त घ्यावयाच्या कार्यक्रमांबाबत सूचना दिल्या. सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे यांनी बैठकीत माहिती दिली.